नपाध अधिकारी प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** किनवट

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0104 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/04/2024 02:14

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 23/04/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/04/2024
**Time From (वेळेपासून):** 16:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/04/2024 **Time (वेळ):** 02:06 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/04/2024 02:06 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लोकसेवक यांचे रहाते घरी ,गोकुंदा, ता किनवट, जि नांदेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीकांत दूधराम चव्हाण

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** दूधराम

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | चिखली तांडा ,किनवट ,किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | चिखली तांडा ,किनवट ,किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9373123084

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रेमसींग मोतीराम आडे | | वडील का नाम : मोतीराम आडे | १. गोकुंदा, ता किनवट, जि नांदेड, ता किनवट, जि नांदेड,किनवट, नांदेड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/रूपये लाचेची रक्कम | 5,000.00 |



Scanned with CamScanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.24/04/2024
मी श्रीकांत दुधराम चव्हाण, वय 36 वर्षे, व्यवसाय: शेती, शिक्षण: 10 वी, रा. चिखली तांडा, ता. किनवट, जि. नांदेड, मो.नं. 9373123084.
समक्ष पोलीस स्टेशन किनवट, जि. नांदेड येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन दिनांक 18/04/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथील पोलीस निरीक्षक श्री अरविंद हिंगोले यांचेकडे किनवट, जि. नांदेड येथे समक्ष हजर होवुन लोकसेवक श्री प्रेमसींग मोतीराम आडे, पदः ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिखली तांडा, ता. किनवट, जि. नांदेड यांचे विरुध्द लाचमागणी बाबत तक्रार दिली की, लोकसेवक यांनी मला मी मौजे चिखली तांडा, ता. किनवट, जि. नांदेड येथे दिनांक 10/04/2024 रोजी शेत सव्हे नंबर 118/2 मधील मोकळी जागा (रिकामा प्लॉट) श्री उत्तम नारायण नाईक रा. चिखली तांडा, ता. किनवट, जि. नांदेड यांचेकडुन 100 /- रुपयेच्या बॉंड पेपरवर नोटरीव्दारे खरेदी केला आहे. सदर प्लॉटवर ग्रामपंचायत कार्यालय चिखली येथील नमुना 8(अ) वर माझे नाव लावन्या करिता लोकसेवक श्री प्रेमसींग मोतीराम आडे, ग्रामसेवक, चिखली खु, ता. किनवट, जि. नांदेड यांनी माझेकडे दिनांक 17/04/2024 रोजी 5000/- रु लाचेची मागणी केली आहे अशा आशयाची तक्रार पोलीस निरीक्षक, श्री हिंगोले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, कॅम्प किनवट, जि. नांदेड यांचेकडे दिली होती.
सदर तक्रारीचे अनुषगांने श्री अरविंद हिंगोले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे दिनांक 18/04/2024 रोजी दोन शासकीय पंच व सापळा पथका सह शासकीय वाहनाने ता.किनवट, जि. नांदेड येथील कोठारी पेट्रलपंपा मागे, किनवट येथे आले होते. सदर ठिकाणी पोनि हिंगोले यांनी माझी, सापळा पथकातील सर्व सदस्य व पंचांची आम्हा एकमेकांची एकमेकांना ओळख करून देवुन त्यांना माझी तक्रार तोंडी कथन करण्यास सांगुन मी तोंडी सांगीतलेली तक्रार व माझी दिनांक 18/04/2024 रोजीची तक्रार सारखीच असल्याची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या.
त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील सदस्य पोकॉं/186 खदीर यांनी मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड, अँथ्रासिन पावडर, अल्ट्रा व्हायलेट लॅम्प बाबत माहिति देवून अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प चे गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्याक्षिक करून दाखविले. त्यानंतर माझे, पोनि श्री हिंगोले व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे एका नविन मेमरी कार्ड मध्ये पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरुन पोकॉं खदीर यांनी ध्वनिमुद्रीत केले.
त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांनी मला लोकसेवक श्री प्रेमसींग आडे कुठे भेटतील याबाबत विचारणा केली असता मी त्यांना सांगीतले की, श्री प्रेमसींग आडे हे त्यांचे रहाते घरी गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड येथे मिळुन येतील. लोकसेवक यांचे रहाते घरी गोकुंदा, ता. किनवट, जि नांदेड येथे लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पोनि श्री हिंगोले यांनी घेवून पोकॉं खदीर यांना सुचना केली की, माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन मला व माझे सोबत पंच क्रमांक 1 श्री षिवाजी रावसाहेब वाघ यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी गोकुंदा येथुन रवाना करणार असल्याचे कळविले. त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरुन पोकॉं/186 खदीर यांनी गोकुंदा, ता. किनवट येथुन माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन लोकसेवक यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी करिता पंच क्र.1 श्री शिवाजी वाघ यांचेसह माझे मोटार सायकल नंबर एम एच 26 ए एन 2230 वरुन वेळ 17ः:44 वा रवाना केले.
त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री शिवाजी वाघ असे माझे मोटार सायकलवरुन लोकसेवक यांचे रहाते घरी गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड येथे गेलो असता लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांचे राहते घरास कुलूप लावले दिसुन आल्याने मी त्यांना माझे मोबाईल नंबर 9373123084 वरुन श्री प्रेमसींग आडे यांचे मोबाईल नंबर 9822618783 वर संपर्क करुन माझे मोबाईलचा स्पिकर ऑन करुन बोलने केले असता श्री प्रेमसींग आडे हे मला म्हणाले की, मी



Scanned with CamScanner

सुट्टीवर आहे बाहेरगावी आलोय तुम्ही पेपर घेवुन मंगळवारी या असे म्हणाल्याने मी सापळा पथकातील सदस्य पोकाँ/खदीर थांबले ठिकाणी गेलो तेथे पोकाँ/खदीर यांनी माझे जवळील व्हाईस रेकाँडर ताब्यात घेवुन बंद केले व आम्ही सर्व सापळा पथक थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी पोनि श्री हिंगोले यांनी पंच क्र.1 श्री शिवाजी वाघ व माझेकडे लाचमागणी पडताळणी कामी रवाना केल्यापासुन ते परत येई पर्यंत काय हकीकत घडली याबाबत विचारणा केली असता पंच क्र.1 श्री वाघ व मी घडले घटनेबाबत हकीकत पोनि हिंगोले यांना सांगीतली. त्यानंतर पोनि हिंगोले, दोन्ही पंच व माझेत चर्चा होवुन पुढील सापळा कार्यवाही ही मंगळवार दिनांक 23/04/2024 रोजी करण्याचा निर्णय घेतला. सदर बाबत मला गोपनियता राखण्याची सुचना देवुन मला घरी जाणेची परवानगी दिली. त्यानंतर दिनांक 23/04/2024 रोजी मी केले तक्रारीचे अनुषगांने श्री अरविंद हिंगोले, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे दोन शासकीय पंच व सापळा पथकासह शासकीय वाहनाने ता.किनवट, जि. नांदेड येथील कोठारी पेट्रलपंपा मागे, किनवट येथे आले. त्याठिकाणी मी पुर्वी पासुनच हजर होतो. सदर ठिकाणी पोनि हिंगोले यांनी माझी, सापळा पथकातील सर्व सदस्य व पंचांची आम्हा एकमेकांची एकमेकांना ओळख करून देवुन सांगीतले की, पंच नामे संदिप रंगनाथ गाडे, पदः वरिष्ट लिपीक, महाराष्ट्र जिवन प्राधिकार, नांदेड यांचे ऐवजी पंच नामे प्रदिप वसंतराव राठोड, पद: वरिश्ठ तंत्रज्ञ, म.रा.वि.वि. कंपनी मार्य, नांदेड यांना गोरमाटी (बंजारा) भाशेचे ज्ञान असल्याने पंच म्हणुन नेमण्यात आल्याचे सांगुन त्यांना माझी तक्रार तोंडी कथन करण्यास सांगुन मी तोंडी सांगीतलेली तक्रार व माझी दिनांक 18/04/2024 रोजीची लेखी तक्रार सारखीच असल्याची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर पंच श्री प्रदिप राठोड यांनी सही केली.

त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील सदस्य पोकाँ/186 खदीर यांनी मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकाँर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती देवून अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प चे गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्याक्षिक करून दाखविले. त्यानंतर माझे, पोनि श्री हिंगोले व दोन्ही पंचांचे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकाँर्डरव्दारे एका मेमरी कार्ड मध्ये पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरुन पोकाँ खदीर यांनी ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांनी मला लोकसेवक श्री प्रेमसींग आडे कुठे भेटतील याबाबत विचारणा केली असता मी त्यांना सांगीतले की, लोकसेवक श्री प्रेमसींग आडे हे सुट्टीवर गेले होते ते सध्या कुठे भेटतील याबाबत सांगता येणार नाही असे कळविले. त्यावेळी पोनि हिंगोले, मी व दोन्ही पंचानी चर्चा करुन लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांचे भेटीचे ठिकाण निश्चित करणे करिता त्यांना फोनकरुन भेटीचे ठिकाण ठरवण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी पोनि हिंगोले यांनी पोकाँ/खदीर यांना फोनकाँल डिजीटल व्हाईस रेकाँर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत करण्याची सुचना दिली. त्यानंतर मी माझे मोबाईल नंबर 9373123084 वरुन लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांना त्यांचे मोबाईल नंबर 9822618783 वर संपर्क करुन भेटीचे ठिकाण निश्चीत करण्या करिता तीन वेगवेगळया वेळी काँल केला असता लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांनी मला भेटी करिता त्यांचे रहाते घरी, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड येथे येण्यास सांगीतले. वरील सर्व काँल पोनि हिंगोले यांचे सुचनेवरुन पोकॅ/खदीर यांनी ध्वनिमुद्रीत केले.

त्यानंतर लोकसेवक यांचे रहाते घरी गोकुंदा, ता. किनवट, जि नांदेड येथे लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय पोनि श्री हिंगोले यांनी घेवून पोकाँ खदीर यांना सुचना केली की, माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकाँर्डर चालु करून देवुन मला व माझे सोबत पंच क्रमांक 1 श्री प्रदिप वसंतराव राठोड यांना लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी गोकुंदा येथुन रवाना करणार असल्याचे कळविले. त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरुन पोकाँ/186 खदीर यांनी गोकुंदा, ता. किनवट येथुन माझे जवळ डिजीटल व्हाईस रेकाँर्डर चालु करून देवुन लोकसेवक यांची भेट घेवुन लाचमागणी पडताळणी करिता पंच क्र.1 श्री प्रदिप राठोड यांचेसह माझे मोटार सायकल नंबर एम एच 26 ए एन 2230 वरुन वेळ 16:40 वा रवाना केले.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री प्रदिप राठोड असे लोकसेवक यांचे घरी गोकुंदा येथे जावुन त्यांची भेट घेवुन माझे कामसंबधाने बोललो असता लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांनी मला आमचे गोरमाटी (बंजारा) भाषेत म्हणाले की, तुझे काम करुन देतो असे म्हणुन पंचासमक्ष माझेकडे पैश्याची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, तुम्ही 5000/- रु म्हणाले होते ते खुप होतात थोडे कमी करा तेव्हा लोकसेवक श्री प्रेमसींग आडे म्हणाले की, मी 7000/- रु म्हणालो होतो, तुम्ही एक हजार रु कमी दया असे म्हणाले तेव्हा मी त्यांना पैसे कमी करण्याची विनंती केली असता लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांनी तुम्ही आपलेच माणसे आहात पैसे घेवुन या, पैसे शिवाय तुमचे काम प्रलंबित राहणार असे सांगुन मला 5000/- रु घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्र.1 मिळुन सापळा पथकातील सदस्य पोकाँ खदीर थांबले ठिकाणी वेळ 16:59 वा चे सुमारास आलो. तेव्हा पोकाँ खदीर यांनी माझे ताब्यातील डिजीटल व्हाईस रेकार्डर घेवुन बंद केले. त्यानंतर मी, पंच क्र.1 व पोकाँ/खदीर असे सापळा पथक थांबले ठिकाणी गेलोत. त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांनी मला शासकीय वाहनाचे बाहेर थांबवुन पंच क्र 1 श्री प्रदिप राठोड यांना षासकीय वाहनात बसवुन घेवून त्याचेकडे लाचमागणी पडताळणी अनुशंगाने विचारपुस केली. त्यानंतर



Scanned with CamScanner

मला शासकीय वाहनात बोलवुन घेवुन दोन पंचासमक्ष माझेकडे लाचमागणी पडताळणी दरम्यान घडलेल्या घटनेची विचारपुस केली. त्यानंतर पो.नि.श्री.अरविंद हिंगोल यांनी पोकॉ खदीर यांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन त्यात लाचमागणी पडताळणी दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकविण्याची सुचना केली. त्याप्रमाणे पोकॉ खदीर यांनी व्हाईस रेकॉर्डरचे स्पीकर ऑन करुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रित झालेले संभाषण मला, दोन्ही पंचास व पो.नि.अरविंद हिंगोले यांना ऐकविले. सदरचे सर्व संभाषण हे आमचे गोरमाटी (बंजारा) भाषेत असल्याने पोनि श्री हिंगोले यांनी पंच क्र. 1 श्री प्रदिप राठोड व सापळा पथकातील सदस्य पोना/राजेष राठोड यांचेशी चर्चा करुन सांगीतले की, लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांनी तक्रारदार यांचे मौजे चिखली खु., ता. किनवट, जि. नांदेड येथील मोकळे प्लॉटवर गाव नमुना 8(अ) वर तक्रारदार यांचे नाव लावण्यासाठी 5000/- रु ची मागणी लाचेची करुन लाचेची रक्कम त्यांना आणुन देण्यास सांगीतल्याचे निश्पन्न झाले असल्याचे सांगीतले. त्यानंतर पो.नि.श्री. अरविंद हिंगोले यांनी सापळा पुर्व कार्यवाही करून लोकसेवक यांचे विरूध्द लाचेचा सापळा लावयाचा असल्याचे सांगुन सापळा पथक थांबले ठिकाणी मला, दोन्ही पंचाना सापळा पुर्व कार्यवाहीचा उद्देश सांगून पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/वडजे यांनी अँथ्रासिन पावडर चे गुणधर्म व अल्ट्राव्हाईलेट लॅम्प चे प्रात्याक्षीक करुन दाखवुन सापळा पुर्व कार्यवाही केली. त्यानंतर पोनि श्री अरविंद हिंगोले यांनी सापळा कार्यवाहीचे अनुशंगाने मला, दोन्ही पंचास तसेच सापळा पथकास सुचना दिल्या. तसेच लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांनी माझेकडुन अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर कोणता ईशारा करायचा ते सांगीतले. त्यानंतर माझेकडील पाच हजार रूपये ज्यात 500 रू. दराच्या 10 चलनी नोटा पोहेकॉ/वडजे यांनी घेवुन त्यास अँथ्रासिन पावडर लावुन माझे अंगात मी परिधान केलेल्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवले.

त्यानंतर पोनि श्री हिंगोले यांचे सुचनेवरून लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांचे रहाते घरी गोकुंदा येथे सापळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यांनतर मला, पंच क्रमांक 01 श्री राठोड यांचे सह माझे मोटार सायकलवर व उर्वरित सापळा पथक हे शासकीय वाहनाने सापळा पथक थांबले ठिकाणाहुन रवाना होवून आमचे मागे येत असल्याचे सांगीतले. त्यावरुन मी व पंच क्र.1 असे माझे मोटार सायकलवर व सर्व सापळा पथक शासकीय वाहनाने रवाना होवुन गोकुंदा, ता. किंनवट जि. नांदेड येथील लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांचे रहाते घराचे परिसरात जावुन थांबलोत. त्यावेळी पोनि हिंगोले यांचे सुचनेवरुन पोकॉ खदीर यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालु करुन वेळ 18:00 वाचे सुमारास माझे गळयात दोरीच्या सहायाने लटकवुन दिले. त्यावेळी सर्व सापळा पथक लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांचे घराजवळच असल्याची खात्री करुन मी पंच क्र.1 श्री प्रदिप राठोड यांचेसह लोकसेवक यांना भेटण्यासाठी त्यांचे घरी गेलो. तेव्हा श्री आडे यांनी आम्हाला त्यांचे घरात बोलवुन घेतले व माझे कामासंबंधाने चार्चा करुन मला पैसे आणले का? अशी विचारणा केली तेव्हा मी लाचेची रक्कम माझे उजवे हाताने माझे अंगात परिधान केले पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिष्यातुन काढुन त्यांचे समोर धरली असता लोकसेवक श्री आडे यांनी लाचेची रक्कम त्यांचे बैठक खोलीतील लाकडी टेबलवर ठेवण्यास इषा-याने सांगीतले. त्यावेळी मी 5000/- रु लाचेची रक्कम श्री आडे यांचे बैठक खोलीतील लाकडी टेबलवर ठेवली असता श्री आडे यांनी सदर लाचेच्या रक्कमेवर त्यांचे जवळील पाण्याची बॉटल ठेवुन पंचासमक्ष लाचेची रक्कम स्विकारली व मला ग्रामपंचायत कार्यालय चिखली खु, ता. किनवट, जि. नांदेड मालमत्ता आकारणी पावती ज्यावर आकारणी केलेल्या कराची रक्कम 160/- रु फक्त अशी पावती दिली. त्यावेळी मी सापळा पुर्व कार्यवाही वेळी दिले सुचने प्रमाणे उजव्या हातात माझे गळयातील पांढरा रुमाल धरुन सापळा पथकास ईशारा केला. त्यावेळी लागलीच सापळा पथक आम्ही थांबलो ठिकाणी आले. पोनि हिंगोले व सापळा पथकातील सदस्यांनी लोकसेवक श्री प्रेमसींग आडे यांना त्यांची ओळख देवुन त्यांना वेळ 18:15 वा चे सुमारास ताब्यात घेतले व पोनि श्री हिंगोले यांचे सुचने प्रमाणे पंच क्र.2 श्री वाघ यांनी लाचेची रक्कम 5000/- रु लोकसेवक यांचे बैठक खोलीतील लाकडी टेबलवरुन ताब्यात घेतली.

लोकसेवक श्री प्रेमसींग मोतीराम आडे, वय 52 वर्ष, व्यवसायः नौकरी, पदः ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, नेमणुकः ग्रामपंचायत कार्यालय, मांडवी, अतिरिक्त कार्यभारः ग्रामपंचायत कार्यालय चिखली खु., ता. किनवट, जि. नांदेड, रा. गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड यांचे विरुध्द मी दिनांक 18/04/2024 रोजी ला.प्र.वि. नांदेड येथील पोनि हिंगोले यांचेकडे दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 23/04/2024 रोजी लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक प्रेमसींग आडे यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्या करीता पदाचा गैरवापर करून माझे मौजे चिखली तांडा, ता. किनवट, जि. नांदेड येथील षेत सव्रे नंबर 118/2 मधील मोकळे प्लॉटवर गाव नमुना नंबर 8(अ) वर माझे नाव लावण्यासाठी पंच क्रमांक 1 श्री प्रदिप राठोड यांच्या समक्ष 5000/- रु लाचेची मागणी करुन 5000/- रु लाचेची रक्कम 18:05 वा चे सुमारास लोकसेवक यांच्या राहते घरी गोकुंदा, ता. किनवट येथे स्विकारली आहे. म्हणुन श्री प्रेमसींग मोतीराम आडे, वय 52 वर्षे, व्यवसायः नौकरी, पदः ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, नेमणुकः ग्रामपंचायत कार्यालय, मांडवी, अतिरिक्त कार्यभारः ग्रामपंचायत कार्यालय चिखली, ता.



Scanned with CamScanner

किनवट, जि. नांदेड, रा. गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेसाठी माझी फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केला असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.
समक्ष, ही फिर्याद दिली सही,

( श्रीकांत दुधराम चव्हाण )
रा. चिखली तांडा, ता. किनवट, जि. नांदेड,
आधार नंबर 6122 5019 8862.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

SAGAR SUBHASHRAO ZADE(SI (Sub-Inspector)) / DGPSSZM8803 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SAGAR SUBHASHRA
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** DGPSSZM8803



Scanned with CamScanner